**सरकार तर्फे साक्षीदार क्रं. २**

**नांव – गौस मेहताबसाब सय्यद,**

**वय – ४७ वर्षे, कामधंदा – व्यापार,**

**रा. – मुसा नगर, उदगीर**

**साक्षीदार क्र.२ यांच्या शपथेवर सरतपास सरकारतर्फे अधिवक्ता श्रीमती पी.एस.कुलकर्णी यांचेद्वारे शपथेवर सुरुः–**

२०१५ साली पोलिसांनी मला पंचनाम्याच्या कामी बोलाविले नव्हते. मी लग्नाच्या कार्यक्रमासाठी मोटार सायकल वरुन जाताना पोलिसांनी माझी सही घेतली होती. पंचनामा दाखविला त्यावर माझी सही आहे. तिला **निशाण ४३** देण्याता आला. मला पंचनाम्यातील मजकूर माहिती नाही.

**साक्षीदार यांना फितूर घोषित करुन सरकारतर्फे उलटतपास शपथेवर सुरु–**

पोलिसांनी मला व शेख चॉद ईस्माइल असे आम्हा दोघांना पंचनाम्याच्या कामी बोलाविले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, खाजामियॉ यांनी जागा दाखविली त्या जागेचा पोलिसांनी आमच्या समोर पंचनामा केला. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा आमच्या समोर केल्याने त्यावर आम्ही सही केली. हे म्हणणे खरे नाही की, अफरोजच्या सांगण्यावरुन मी खोटी साक्ष देत आहे.

**साक्षीदार क्र. २ चा उलटतपास आरोपी तर्फे श्री. एन.एन.पटेल विधीज्ञ यांचेद्वारे शपथेवर सुरुः–**

फिर्यादी कोण आहे त्याला मी ओळखत नाही. मी साडी विक्रीचा व्यवसाय करतो. मी दारोदारी जावून साड्या विकतो. लग्न आमच्या घरचे असल्याने पोलिसांनी माझी सही घेतली. पोलिसांनी माझ्या समक्ष पंचनामा वाचला नाही. पोलिसांनी मला सही करायला सांगितली मी सही केली.

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2026.01.22 16:12:07 +0530

दिनांक – २२/०१/२०२६ न्यायदंडाधिकारी प्र.व.
उदगीर (न्यायालय क्रं. १), उदगीर.

**दाखला**

साक्षीदार यांची साक्ष हिंदी भाषेत घेण्यात आली. तिचा अनुवाद करुन मराठीत नोंदवून घेण्यात आली. साक्षीदाराला जबाब हिंदीत सांगितला व तो मराठीत नोंदवून घेतला व तो त्यांच्या सांगण्याप्रमाणे असल्याचे हिंदीत अनुवादीत करुन सांगण्यात आले. म्हणून सदर दाखला.

श्रवणोत्तर स्वीकृत,

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2026.01.22 16:12:11 +0530

दिनांक – २२/०१/२०२६ न्यायदंडाधिकारी प्र.व.
उदगीर (न्यायालय क्रं. १), उदगीर.